
# गहू लागवड तंत्रज्ञान

कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ. (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)

---------------------------------------------------------------------------------------------------------

**गहू लागवडीचे महत्व**

- अधिक उत्पादण क्षमता असलेले पिक
- पिकांची फेरपालट होण्यासाठी महत्वाचे पिक
- कमी कालावधी असल्याने दुबार पिक घेणे शक्य




- हरबरा बरोबर येत नाही अशा ठिकाणी गहू घेतला जातो.
- कमी मेहनतीचे व सोपे पिक
- किडींचा व रोगांचा प्रादूर्भाव फार कमी होतो.
- प्रमुख अन्नधान्य

**गहू वाण कसा असावा**

- जास्त फुटवे व ओंब्या असणे
- ओंबीत दाण्यांची संख्या जास्त असावी व दाण्यांचे जास्त वजन. (अधिक उत्पादन क्षमता)
- कमी उंचीचा काडी मजबूत असलेला व न लोळनारा
- धान्याची व चपातीची प्रत चांगली, अधिक बाजारभाव
- किड व रोगांना प्रतीकारक
- वातावरनातील बदलांना सहनसील, कमी पाणी लागणारा.

**जमिनीची निवड**

- मध्यम ते खोल भारी व पाण्याचा उत्तम प्रकारे निचरा होणाऱ्या जमिनीची निवड करावी. पाणी व खतांचा पुरेसा पुरवठा असल्यास हलक्या ते मध्यम जमिनीतसुध्दा या वाणाची लागवड करता येते.

**वान**

- पिडीकेव्ही वाशिम
- ए.के.ए.डब्लल्यु ४६२७

- पी .डी. के.व्हि. सरदार (एकेएडब्लल्यु ४२१०-६)
- ए.के.ए.डब्लल्यु ५१००
- डब्लल्यु.एस.एम. १३८

**बिज प्रक्रिया:**

- पेरणीपूर्वी थायरम किंवा व्हिटाव्ह्याक्स ७५ % पाण्यात मिसळणारी भुकटी हे औषध २.५ ते ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बियाण्यास लावून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर ॲझोटोबॅक्टर व पी.एस.बी. हे जिवाणू संवर्धन प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यास पेरणीपूर्वी 2 तास अगोदर लावून बियाणे सावलीत वाळवावे. जिवाणू संवर्धन लावून पेरणी केल्यास उत्पन्नात निश्चितच वाढ साधता येते.

**पेरणीचे अंतर व खोली:**

- पेरणी करतांना बियाणे ओलाव्यात परंतु ५ ते ६ सें.मी. पेक्षा जास्त खोलवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. पेरणी करीता दोन ओळीतील अंतर २० ते २२ सें.मी. ठेवावे.

**पेरणीची योग्य वेळ:**

- कोरडवाहू मर्यादित ओलीत गहू पेरणी : १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर
- बागायती वेळेवर गहू पेरणी : ५ ते १५ नोव्हेंबर
- बागायती उशिरा गहू पेरणी : १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर

**बियाण्याचे प्रमाण:**

- कोरडवाहू गहू पेरणी: ७५ किलो/हेक्टर
- कोरडवाहू मर्यादित ओलीत गहू पेरणी : ७५ ते १०० किलो/हेक्टर
- बागायती वेळेवर गहू पेरणी : १०० किलो/हेक्टर
- बागायती उशिरा गहू पेरणी : १२५ ते १५० किलो/हेक्टर

**खत व्यवस्थापन :**

- कोरडवाहू मर्यादित ओलीत गहू पेरणी : ४०:२०:०० NPK किलो/हेक्टर
- बागायती वेळेवर गहू पेरणी : १००:५०:५० किलो/हेक्टर /१२०:६०:६० NPK किलो/हेक्टर
- बागायती उशिरा गहू पेरणी : ४०:४०:४० NPK किलो/हेक्टर


- पेरणी नंतर ४५ व ६५ दिवसांनी २.० टक्के युरीयाची फवारणी करावी.
- जमीनीच्या मगदुराप्रमाणे १५ ते २० दिवसांच्या अंतराने ओलीत करावे

**फक्त एकच ओळीत शक्य असल्यास**

- कांडी धरण्याच्या सुरुवातीस 40 ते 42 दिवस

**दोन ओळीत करणे शक्य असल्यास**

- पहिले मुकुट मुळे फुटण्याच्या वेळी 18 ते 20 दिवस आणि
- पीक फुलोऱ्यावर येण्याचे वेळी 65 ते 70 दिवस




**तीन ओलित करणे शक्य असल्यास**

- मुकुटमुळे फुटण्याचे वेळी १८ ते २१ दिवस
- कांडी धरण्याची सुरुवात ४० ते ४२ दिवस
- आणि पीक फुलोऱ्यावर असताना ६० ते ६५ दिवस

**आंतरमशागत:**

- पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांचे आत १ किंवा २ वेळा निंदणी करावी. आंतर मशागतीमुळे तणांचा नाश होवून जमिनीत ओलावा टिकून राहतो. मोठया प्रमाणात अरूंद पानाची तणे असल्यास पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी २,४ डी (सोडीयमसाल्ट) या तणनाशकाची ६२५ ते १००० ग्राम क्रियाशील घटक ५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी. रूंद पानाची तणे असल्यास अलग्रीप या तण नाशकाची प्रती हेक्टरी २० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी.

**पीक संरक्षण:**

- गहू पिकावर तांबेरा या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास डायथेन एम-४५ या बुरशीनाशकाची प्रती हेक्टरी १५०० ग्रॅम भुकटी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. उंदरांचा बंदोबस्त करण्यासाठी विषयुक्त आमिषांचा वापर करावा. हे आमिष तयार करण्यासाठी धान्याचा भरडा ९८ भाग, थोडे गोडे तेल व २ भाग झिंक फास्फाईड किंवा ब्रोमाडिआलन एकत्र मिसळावे. चमचाभर (अंदाजे १० ग्रॅम) विषारी मिश्रण प्लॅस्टीकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळांमध्ये टाकावे.